# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांकः- ०९/०९/२०१८

## नाशिक ग्रामीण पोलीसांचे कोंम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी ऑलआउट स्किम

### मनमाड शहरात अट्टल गुन्हेगाराकडुन गावठी पिस्टल हस्तगत, मालेगावात धारदार शस्त्रे बाळगणा-यांवर कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली दिनांक ०८/०९/२०१८ रोजी पिठोरी आमास्येला रात्रीपासुन जिल्हयात अचानक कोम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी ऑलआउट स्किम प्रभावी व परिणामकारकपणे राबविण्यात आली. सदर कारवाईत पोलीस अधीक्षकांपासुन ते पोलीस कर्मचा-यापर्यंत सर्वच स्टाफने रस्त्यांवर येवुन सक्त व सशस्त्र गस्त घालुन कारवाई केली आहे.

**पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सत्वर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. निलोत्पल सो.** व **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय कोम्बींग ऑपरेशन, नाकाबंदी व ऑलआउट स्किम राबवुन कारवाई केली, दरम्यान मालाविरूध्दचे गुन्हे - दरोडा, जबरीचोरी, घरफाडी, चोरी यांमधील रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे व फरार असलेले आरोपी, हिस्ट्रीशीटर यांना चेक करण्यात येवुन सी.आर.पी.सी. व मुं.पो.कायदयान्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच नाकाबंदी दरम्यान संशयीत व विना नंबरची मोटर वाहने, भरधाव वेगाने व दारू पिउन वाहन चालविणारे, तसेच सार्वजनिक ठिकाणी, मुख्य चौकात विनाकारण हुल्लडबाजी करणारे इसमांवर कारवाई करण्यात आली. महामार्ग व मुख्य रस्त्यांवरील हॉटेल, ढाबे चेक करून रात्री उशिरापर्यंत सुरु असलेले हॉटेल व ढाबे मालकांवर मुंबई पोलीस कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील मुख्य रस्ते, बाजार पेठ, सराफ बाजार, बँक व ए.टी.एम., धार्मिक स्थळे, रेल्वे व बसस्थानक, टोल नाके अशा अनेक ठिकाणांवर सशस्त्र पेट्रोलिंग करून संशयीत इसमांना चेक करण्यात येवुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

ऑलआउट स्किम दरम्यान दरोडागस्त पेट्रोलिंगवर असलेले **स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मनमाड शहरात अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणारे इसमास** ताब्यात घेवुन कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे, मनमाड शहरातील मालेगाव चौफुली परिसरात एक इसम विनापरवाना बेकायदा अवैध शस्त्र बाळगुन सज्ञेय अपराध करण्याचे उद्देशाने संशयीतरित्या फिरत आहे बाबत समजले. त्यावरून स्थागुशाचे पथकातील **पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नाईक**, सपोउनि अशोक पाटील, पोना चेतन संवत्सरकर, पोकॉ हरीष आव्हाड, गिरीष बागुल यांनी सापळा रचुन **सराईत गुन्हेगार** नामे **गुलाम फरिद अब्दुल वाहिद उर्फ फरिद बोबडया, रा. मोहनबाबा नगर, मालेगाव** यास त्याचे कब्जातील हिरो सी.बी.झेड. मोटर सायकल क्र. एम. एच.४१.क्यु.२२३४ या दुचाकीसह ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात **एक देशी बनावटीचे गावठी पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे** मिळुन आले. सदर आरोपीने विनापरवाना बेकायदेशीररित्या अग्निशस्त्र कब्जात बाळगले म्हणुन त्याचे विरूध्द **मनमाड शहर पोलीस ठाणेस ॥ गुरनं १६१/२०१८ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरूध्द मालेगाव शहरात जबरी लुटमार व गंभीर दुखापतीचे गुन्हे दाखल आहे.

तसेच मालेगाव शहरातील पवारवाडी पोलीस ठाण्याचे **सहा.पोलीस निरीक्षक श्री. सचिन वांगडे** हे त्यांचे पथकासह मध्यरात्रीचे सुमारास दातारनगर, ६० फुटी रोड परिसरात कोम्बींग ऑपरेशन करीत असतांना रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे **१) इम्रानखान अताउल्लाखान उर्फ शेट्टी,** रा. दातारनगर, मालेगाव व **२) अकिल अहमद निसार अहमद,** रा. अब्दुल्लानगर, मालेगाव हे अवैधरित्या धारदार शस्त्रे कब्जात बाळगतांना मिळुन आले. सदर आरोपीतांचे कब्जातुन ०२ धारदार तलवारी जप्त करण्यात आल्या असुन **पवारवाडी पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे ०२ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन व ऑलआउट स्किम दरम्यान केलेल्या कारवाईत जिल्हयातील मालाविरूध्दचे गुन्हयातील एकुण ६४ रेकॉर्डवरील गुन्हेगार व हिस्ट्रीशीटर यांना चेक करण्यात येवुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच बेदरकारपणे वाहन चालविणारे, विना नंबरची वाहन वापरणारे, ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह करणारे असे एकुण १३९० वाहने चेक करण्यात आली व मोटर वाहन कायदयान्वये एकुण २३९ केसेस करून ४८,१००/- रू. चा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच पाहिजे व फरार असलेले ०९ आरोपीतांना पकडण्यात आले आहे. अवैधरित्या दारूविक्री करणारे व गावठी दारू तयार करणारे इसमांवर छापे टाकुन मुंबई दारूबंदी कायदयान्वये एकुण १३ केसेस करण्यात आल्या असुन २८,७७० रू. चा मद्देमाल हस्तगत करण्यात आला, तसेच मुंबई जुगार कायदयान्वये ०३ केसेस दाखल करण्यात आलेल्या आहे. महामार्गावर रात्री उशिरा पर्यंत हॉटेल / ढाबे सुरू ठेवणारे हॉटेल / ढाबे मालकांवरही सदर स्किम दरम्यान कारवाई करण्यात आली आहे. तसेच मा.न्यालयांकडुन प्राप्त झालेले एकुण ४८ समन्स, २२ बेलेबल वॉरंट व २३ नॉन बेलेबल वॉरंटची सदर मोहिमेदरम्यान बजावणी करण्यात आली आहे.

**मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेशान्वये **<u>आगामी काळात साजरे होणारे सण उत्सवाचे अनुषंगाने</u>** जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण, मालाविरूध्दचे गुन्हयांना प्रतिबंध व गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी यापुढेही अशाच प्रकारे ऑलआउट स्किम, नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन सतत राबविण्यात येणार आहे.

-----------------------------------------------------------------------------